
INTERNATIONAL JOURNAL OF MULTIDISCIPLINARY EDUCATIONAL RESEARCH
ISSN:2277-7881; IMPACT FACTOR :6.514(2021); IC VALUE:5.16; ISI VALUE:2.286
Peer Reviewed and Refereed Journal: VOLUME:10, ISSUE:4(3), April:2021
Online Copy Available: www.ijmer.in
Digital certificate of publication:http://ijmer.in/pdf/e-Certificate%20of%20Publication-IJMER.pdf

# चक्रधर स्वामींच्या सान्निध्यातील स्रिया

**श्रीम.स्वाती विजयकुमार बांदल M.A. B.Ed**

**‘सारथी निवास’ गेवराई, ता-गेवराई जि-बीड.**

**गोषवारा :-**

महानुभाव संप्रदायाचा ( पंथाचा ) उगम अतिशय समृद्ध झाला यादव काळात इसवी सनाच्या तेराव्या शतकात चक्रधर स्वामींच्या पुढाकाराने उदयास आलेल्या ह्या पंथाची पुढील दोन तीन शतके भरभराटीची गेली. महानुभाव सोबतच या पंथाची महात्मा,अच्युत ,जयकृष्णी , भटमार्ग , परमार्ग अशीही नावे होती.नरेंद्र, भास्करभट ,यांसारखे रसिक कवी दामोदर पंडितासारखे भाष्यकार ,महदंबेसारखी मराठीतील पहिले कथाकाव्य लिहिणारी कवयित्री असे अनेक रचनाकार महानुभावीय प्रेरणेने प्रेरित होऊन लिहिते झाले .

**बीजशब्द :-** धवळे ,लीळा , पंथ , आरोगणा , परिभ्रमण

## प्रस्तावना :-

मध्ययुगीन काळातील स्रीजीवन हे अनेक अंगानी बांधलेले होते.मध्यकाळात म्हणजेच बाराव्या शतकात महाराष्ट्रातील स्रीयांच्या जीवनाचे अनेक पैलू लीळाचरित्राचा अभ्यास करताना बघावयास मिळतात . लीळाचरित्रातील स्री संदर्भ स्री जीवनात स्रियांना दुय्यम स्थान होते.पुरुषप्रधान संस्कृतीच्या जोखडाखाली

स्री जीवन दडपलेले होते.धर्मकार्य , सामाजिक , आर्थिक व सांस्कृतिक जीवनात स्रियांचा कोंडमारा होत होता. असे असले तरी श्री चक्रधर स्वामींनी ही जोखड व्यवस्था झुगारून जीवांच्या उद्धाराचे कार्य हाती घेतले . स्वामींनी स्रीयांच्या मनात आत्मविश्वास वाढवला. त्यांना धर्मचर्चा , धर्माचरण व मुक्तीची कवाडे उघडी करून दिली.आणि त्यामुळे त्याचे भावविश्व अत्यंत संवेदनशीलतेने उमटले आहे.

## स्रियांचा परिचय व कार्य :-

१ ) बाईसा उर्फ नागांबिका -

पैठण हे यादवकालीन अतिशय समृद्ध आणि विशाल नगर होते.ते महाराष्ट्राचे सांस्कृतिक केंद्रच होते. बोणेबाईची मैत्रीण नागुबाई ( बाईसा ) ही पैठण येथे वामदेव नामक सत्पुरुषाची शिष्या होती.ती पयोवृती होती.हासुबाई आणि पांडे तिचे शिष्य होते.बोणेबाईंनी स्वामींच्या अलौकिकत्वाची अपार स्तुती बाईसाजवळ केली. या महापुरुषांना पाहावे अशी इच्छा स्वाभाविक तिच्या मनात झाली . दुपारनंतर स्वामींनी आपले बिऱ्हाड सोडून भिगवती वेशी मार्गाने नगरात प्रवेश केला .बाईसा वामदेवाच्या गुंफेकडे जात असताना तिला स्वामीचे दर्शन झाले. बोणेबाईने सांगितलेले हेच ते असावेत अशी तिची खात्री झाली.

त्यांची विचारपूस करून बाईसा स्वामींना गुंफेकडे घेऊन गेल्या.त्यांना सुरुवातीला बसायला पायपुसणे टाकले व दुधीकरंट्यात पाणीभात वाढला.त्या दिवशी स्वामी तिथेच निद्रिस्थ झाले . स्वामी नागुबाईच्या गुंफेत तीन दिवस राहिले. स्वतःच्या सामर्थ्याने स्वामींनी बाईसाचे हृद्य परिवर्तन केले . व तिचे मन ईश्वर प्राप्तीकडे लावले.तिसऱ्या दिवशी स्वामीने सकाळच्या प्रहारात प्रेमादृष्टीने बघून एका कळीकेच्या प्रेमाचा संचार केला.स्वामी परमेश्वर अवतार आहेत.अशी बाईसाची श्रद्धा

बसली .बाईसानी स्वामींचे पाय धरले व म्हणाल्या , “ बाबा :पापिणी बाबा नेणोची सुळी वळ घालीए होतीए: याप्रकारे बाईसा पंथात आली व स्वामींची एकनिष्ठ भक्त बनली . पंथात तिचे स्थान अतिशय श्रेष्ठ दर्जाचे आहे.

२ ) महदंबा उर्फ महदाइसा -

महदाइसा उर्फ महदंबा म्हणजे मराठीतील आद्य कवियित्री आणि चक्रधरांची शिष्या पट्टशिष्य नागदेवाचार्य यांची चुलत बहिण.गोविंदप्रभूंनी श्रीकृष्णाच्या विवाहाचा सोहळा केला असता त्यावेळी स्वत:ला करवली समजून महदंबेने जी १४९ गीते रचून म्हंटली त्यास ‘धवळे’ असे म्हणतात. महदंबेच्या नावावर धवळे ,मातृकी ‘रुक्मिणी -स्वयंवर’ व गर्भकांड ओव्या या रचना आहेत.ज्ञानेश्वर मंडळात मुक्ताबाईस जो मान होता ,तो मान चक्रधर मंडळात तिला होता.

याच महदाईसाला तिचे वडील वायनायक म्हणायचे रूपे वाया गेली .ती स्वामी जवळ हे सर्व सांगते.तेंव्हा स्वामी म्हणतात . बाई तुम्ही तेयाचेया अवघेया तेव्हारा उपेगा नवचा तरि म्हणती आणि काई .” यावरून त्या काळात स्त्रियांनी कसे वागावे यावर बंधने होती.पण तरीही तिची स्वामीवरील निष्ठा कायम राहते . ती लोक अपवादाचा विचार करत नाही हे किती धारीष्टाचे काय आहे.

३) शांताबाईसा -

शांताबाईसाचे मुळ नाव मायबाईसा .वसमत जि.परभणी येथील एका सात्विक स्वभावाच्या व मध्यम परिस्थितीच्या ब्राम्हणाशी तिचा विवाह झाला.एक मुलगा व दोन मुली अशी तीन अपत्ये झाली . मुलींच्या लग्नानंतर काही दिवसांनी पतीचे कालवश झाले . पुढे थोड्याच दिवसात एकलुता एक मुलगा तोही काळाने

हिरावून घेतल्या . यामुळे तिला अतिशय दु:ख झाले.त्यात दुसऱ्या दु:खाची भर पडली. थोरली मुलगी विधवा झाली व धाकट्या मुलीस वेड लागले .ती म्हणाली , एकी पोटेसी बांधैन एकी पाठीसी बांधेन : आणि समुद्रा आतु रिन्गैन :”म्हणून ती द्वारावातीस निघाली.

पैठणला आली सारंग पंडित हे तिचे भाचे होते.त्यांना ती भेटली .ते म्हणाले , “ माईबाई तुम्ही द्वारावनीस जाल तेंव्हा वेरूळवरून जा तेथे आमचे गोसावी राहतात.त्यांचे दर्शन घ्या .मग ती वेरूळ येथे आली .गोसावियांचे दर्शन झाले.आसू आणि नारळ अर्पण केले.श्री चरणा लागली आणि ती श्रीमूर्ती अवलोकित जवळ बसली .मग गोसावियांना सर्व सांगितले.जसमाईसाला सासरला पाठवून द्या.त्यावर ती म्हणाली सासू सासरे हिचा प्रतिपाळ करणार नाहीत.स्वामी म्हणाले,ते आनंदाने तिचा स्वीकार करतील .त्या दिवशी शांताबाईसाला स्थित्यानंद झाला.पुढे स्वामिनी तिला रिद्धपूरला गोविंदप्रभूंचे सेवादास्य करावयाला पाठविले .या स्रियांच्या दु:खापुढे बघून त्या काळातील स्रियांची अवस्था लक्षात येते.

४) उमाईसा -

उमाईसा ही पैठणच्या सारंगपंडिताची दुसरी पत्नी होती.तिचे लग्न लहानपणात झाले होते.सारंग पंडिता पासून तिला धनाईसा नावाची मुलगी झाली होती.एकदा स्वामी सारंगपंडिताच्या घरी जातात.तेंव्हा उमाईसा लेकरू घेऊन बसली होती.स्वामींना बघून ती लाजली .व तिने आपले पदराखाली झाकले.तेंव्हा स्वामींनी तिला विचारले “ बाई हे काई : हालत असे ? जीजी हे लेकरू ;स्वामी म्हणाले बाई कडिये घेया याचिया अमृतकळा शिखती ? त्या वाक्यासरशी तिची लाच फिटली .

INTERNATIONAL JOURNAL OF MULTIDISCIPLINARY EDUCATIONAL RESEARCH
ISSN:2277-7881; IMPACT FACTOR :6.514(2021); IC VALUE:5.16; ISI VALUE:2.286
Peer Reviewed and Refereed Journal: VOLUME:10, ISSUE:4(3), April:2021
Online Copy Available: www.ijmer.in
Digital certificate of publication:http://ijmer.in/pdf/e-Certificate%20of%20Publication-IJMER.pdf

**५) देमती पैठणकर -**

**देमाईसा ही स्वामींच्या परिवारातील एक विधवा स्री होती.प्राचीन काळातील विधवा स्रिया कार्तिकस्नान ,वृत्त, व उपासना व कृश चांद्रयन इ.व्रते करीत असत.त्याचप्रमाणे हिच्या जीवनात होते घडून येते होते.देमाईसा धार्मिक होती.ती दररोज पुराण श्रवण करण्यास जात असे.या श्रवणामुळे तिच्या मनावर चांगले संस्कार रुजले होते.पुराणे सांगतात त्याप्रमाणे गुरुशिवाय मोक्ष नाही त्यामुळे आपणही गुरु करावा या हेतूने ती तपस्वी वामदेव यांना गुरु करून घेण्यासाठी आली ;परंतु तेथील विपरीत दृश्ये पाहून ती आल्या पावली परत निघाली वाटेतच तिची मैत्रिणी लखूबाईसाला भेटली .तिला घडलेला सर्व वृतांत सांगितला.मग ती म्हणाली चल भोगनारायणाच्या मंदिरात तेथे तुला गुरु करून देते .मग दोघी स्वामींकडे आल्या.**

**त्यावेळी स्वामी भोगनारायणाच्या मठात चौकामध्ये आसनस्थ होते.त्या दोघींनी स्वामींचे दर्शन घेतले.स्वामींनी त्यांना काही उपदेश केला. देमाईसाला स्वामींचे आचार-विचार आवडले.असे गुरु करणे योग्य आहे म्हणून देमाईसाने स्वामींना गुरु करून घेतले यानंतर स्वामींनी तिला स्थिती दिली. तेव्हांपासून ती स्वामींची शिष्या झाली. देमाईसा कृष्णभक्त होती. तिला श्रीकृष्ण भगवंताचे संपूर्ण चरित्र पाठ होते. या कृष्ण भक्ताला या युगात श्रीचक्रधर हे श्रीकृष्ण रूपाने भेटले,तेंव्हा देमाईसाचे जीवन निर्मल मोत्यासारखे झाले.**

**६) साधा वडनेकर -**

**साधा ही चारठाणे येथील रहिवासी होती.हे गाव पूर्वी यादवराजांच्या काळी वऱ्हाडात होते.साधेचा ब्राह्मण कुळात जन्म झाला. साधा ही दादोस उर्फ रामदेव यांची**

पुतणी होती.ते चक्रधर स्वामींचे पहिले निष्ठावान शिष्य होते. रामदेव चक्रधर स्वामींना भेटण्यास निघाले असताना वाटेत साधेच्या माहेरी चारठाणे येथे आले.तेथेच साधाची व महदाईसांची भेट झाली.त्यांच्या तोंडून श्री.गोविंदप्रभूंचा महिमा ऐकून ती म्हणाली, पिसे,पिसे,राऊळ ते काहो !लेकृवा पाठी धावता तेच का ? असे गोविंदप्रभूचे नाम घेताच साधेला स्थितीचा अनुभव आला.त्यानंतर दादोस बरोबर तिने स्वामींची भेट घेतली .

साधा ही वेधवंत होती. एकदा पैठण येथे लोणार तीर्थस्थान करून येत असताना साधेला रिंगणीची फुले दिसली .या फुलानेच तिने स्वामींची अष्टांग पूजा केली .तेंव्हा तिच्या भक्तीचे कौतुक करताना स्वामी म्हणाले , ‘हे काई साधे हो !देव सुवर्ण फुली पुजीतये !’अशी साधा ही साधी भोळी शिष्या होती.

७) आऊसा थाळनेरकर -

आऊसा ही खानदेशातील धुळे जिल्ह्यातील थाळनेर या गावची रहिवासी होती.ती गरीब घराण्यातील होती.आईवडील व पती यांचे निधन झाले म्हणून उदास होऊन तिने घर सोडले. ती भिक्षा मागत हिंडू लागली . एकदा नदीच्या काठी एका ब्राह्मणाने तिला विचारले,तुम्ही चक्रधर स्वामींच्या आहात काय ? यावर तीन म्हणाली , है रे चक्रधर कवणारे !स्वामींचे गुणविशेष त्याने वर्णन केले व तिला स्वामींना भेटण्याची आसक्ती निर्माण झाली.स्वामींना भेटून तिने त्यांच्या सान्निध्यात राहून संन्यास दीक्षा घेतली.

## निष्कर्ष :-

१) लीळाचरित्रातून दिसून येणाऱ्या स्री प्रतीमाचा आढावा येथे घेण्याचा प्रयत्न केला आहे .

२) श्री चक्रधर स्वामींचा स्रीयां विषयीचा दृष्टीकोन अतिशय पुरोगामी होता. .

३) चक्रधर स्वामींनी त्या काळातील स्रीयांचा आत्मविकास केला.

४) महदंबेला मराठी तील पहिली कथा काव्य लिहिणारी म्हणून सन्मान स्वामींमुळे प्राप्त झाला

## संदर्भग्रंथ : -

१) लीळाचरित्र, डॉ. वि.भि.कोलते : राज्यसाहीत्य संस्कृती मंडळ पुणे ,प्रथम आवृत्ती १९८२ पृ.५९

२) स्मृतीस्थळ वा.ना.देशपांडे व्हीनस प्रकाशन पुणे , ६ वी आवृत्ती पृ.२१८

३) महानुभावांचा इतिहास :कै.मुरलीधर कोळपकर ,श्री कृष्ण ज्ञानमंदिर उमरखेड पृ.३२३

| | |
|---|---|
| Filename: | 26 |
| Directory: | C:\Users\DELL\Documents |
| Template: | C:\Users\DELL\AppData\Roaming\Microsoft\Templates\Normal.dotm |
| Title: | |
| Subject: | |
| Author: | Windows User |
| Keywords: | |
| Comments: | |
| Creation Date: | 4/16/2021 4:41:00 PM |
| Change Number: | 6 |
| Last Saved On: | 4/26/2021 11:43:00 AM |
| Last Saved By: | Murali Korada |
| Total Editing Time: | 9 Minutes |
| Last Printed On: | 4/29/2021 9:16:00 PM |

As of Last Complete Printing

Number of Pages: 7

Number of Words: 1 (approx.)

Number of Characters: 8 (approx.)